# प्रकरण दुसरे

## रिपब्लिकन पक्षाची घटना व जाहिरनामा

## प्रकरण दुसरे

## रिपब्लिकन पक्षाची घटना व जाहीरनामा

१९५२ च्या सार्वत्रिक निवडणूकीत शेडयूल्ड कास्ट फेडरेशनला फार मोठा पराभव पत्करावा लागलेला होता. निवडणूकीत मिळालेल्या अपयशामुळे डॉ. आंबेडकर हे निराश झालेले होते. इ.स. १९४२ साली निर्माण झालेला हा पक्ष भारतीय राजकारणात स्थिर व बळकट होऊ शकला नाही. त्यामुळे डॉ. आंबेडकरांना हा पक्षच बरखास्त करावा असे वाटू लागले होते. कारण संयुक्त मतदार संघांच्या रचनेमुळे जातीय आधारावर निर्माण झालेली ही संघटना अपयशी ठरलेली आहे. असे त्यांचे मत तयार झाले होते. दलित फेडरेशनच्या वेळोवेळीच्या निवडणूकीतील पराभवाच्या वेळी आंबेडकरांनी आपल्या पक्षातील लोकांना नाउमेद न होता आपला पक्ष टिकवून ठेवा असा संदेश दिलेला होता. परंतु पक्षाच्या वारंवार अपयशामुळे त्यांना नवीन पक्षाची आवश्यकता वाटू लागलेली होती. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कट्टर लोकशाहीचे पुरस्कर्ते होते आणि सुदृढ लोकशाहीसाठी व लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी प्रबळ विरोधी पक्षाची आवश्यकता त्यांना वाटत होती. भारतीय राजकरणात कॉंग्रेस हा एकच पक्ष सतत प्रभावी व सत्ताधारी बनलेला होता. त्यामुळे या कॉंग्रेस पक्षाला प्रबळपणे विरोध करु शकणारा व सर्वांना सामाऊन घेणारा सर्वसमावेशक असा पक्ष त्यांना स्थापन करावयाचा होता. म्हणून "१९५६ च्या आक्टोबर मध्ये एका संध्याकाळी त्यांनी पत्रकार परिषद घेतली त्यात त्यानी येत्या सार्वत्रिक निवडणूकीपूर्वी रिपब्लिकन पक्षाच्या निर्मितीची इच्छा व्यक्त केली. स्वातंत्र्य, समता व बंधुता ज्याना मान्य आहे अशा सर्वांसाठी हा पक्ष खुला राहील असे त्यांनी सांगितले. ४ डिसेंबर, १९५६ च्या संध्याकाळी आचार्य अत्रे व एस्.एम्.जोशी या दोघांना दोन पत्रे लिहिली. हे दोघेही तत्कालीन महाराष्ट्रातील कॉंग्रेसचे

कागणी विरोधक होते व संयुक्त महाराष्ट्र समितीचे आघाडीचे नेते होते. या दोन्ही पत्रांचा उद्देश त्यांना रिपब्लिकन पक्षात येण्यासंबंधी त्यांचे मन कळविण्याचा होता. डॉ. राम मनोहर लोहियांशीसुध्दा या संदर्भात पत्रव्यवहार झालेला होता. परंतु बाबासाहेबांच्या अकाली व अनपेक्षित मृत्यूमुळे पुढील प्रगती होऊ शकली नाही." १

डॉ. बाबासाहेबांना आपल्या आयुष्याच्या शेवटच्या कालखंडात रिपब्लिकन पक्षाची स्थापना व्हावी व तो पक्ष सर्वांना सामावून घेणारा असावा असे वाटत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या संदर्भात जनतेला पुढील प्रमाणे उद्देशून पत्र लिहिले होते. या पत्रावरून पक्षाची उद्दिष्टये ध्येये व आराखडा समजून येईल.

पक्ष म्हणजे काय ?

पक्ष हा सैन्यासारखा असतो, त्याला खालील बाबींची आवश्यकता असते.

१) सरसेनापतीसारखा पुढारी (नेता),

२) संघटना, तीत – अ) सभासद,

ब) मूलभूत योजना

क) शिस्त, या गोष्टींचा समावेश होतो.

३) ध्येय आणि धोरण, तत्त्वज्ञान.

४) कार्यक्रम.

५) राजकीय डावपेच व मुत्सद्देगिरी (म्हणजेच ध्येयसिध्दीसाठी, केव्हा व कशी करायची यांची योजना)

सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, विशिष्ट ध्येयवादाने प्रेरित होऊन मतदारांनी केलेली संघटना म्हणजे पक्ष होय.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ह्या संस्थेस पक्षाला मान्य असलेल्या तत्त्वज्ञानाच्या व उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी मतदारांची संघटना करावी लागेल.

ही पक्ष संघटना पुढीलप्रमाणे काम करील.

१) पक्ष स्थापनेसाठी व त्यांच्या संघटित वाढीसाठी झटणे, आणि पक्षाचे तत्वज्ञान व ध्येयधोरण यांचा प्रचार करणे.

२) पक्षाची तत्वे, विचारसरणी यांचा प्रचार, वृत्तपत्रे, सभा-संमेलन, व्याख्याने, वाङ्.मय-लेखन इत्यादी मार्गांनी करणे.

३) पक्ष सभासदांच्या वतीने संयुक्त चळवळी व राजकीय चळवळी व राजकीय कृती करण्यासाठी निवडणुका लढविणे.

"रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया" ध्येय व उद्दिष्टे :

भारतीय घटनेचा उपोद्घात पुढीलप्रमाणे आहे.
"आम्ही भारतातील लोक प्रतिज्ञापूर्वक असे ठरवितो की, भारत हे स्वतंत्र सार्वभौम लोकसत्ताक राष्ट्र, आणि त्यातील सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, विचार, भाषण, मत, आणि धार्मिक स्वातंत्र, संधी व सामाजिक प्रतिष्ठा याबाबत समता, व्यक्तिस्वातंत्र्य व राष्ट्रैक्य साधणारा बंधुभाव, या गोष्टी मिळवून देण्यासाठी झटू".

भारतीय घटनेच्या ह्या उपोद्घातामधील ध्येय व उद्दिष्टे (न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व) साध्य करणे हेच रिपब्लिकन पक्षाचे ध्येय व उद्दिष्ट राहील. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी रिपब्लिकन पक्ष सार्वजनिक व्यवहारात खालील तत्वांना बांधलेला राहील.

१) सर्व भारतीयांना समान न्याय मिळेल, एवढेच नव्हे तर समान न्याय हा प्रत्येक भारतीयांचा हक्क आहे असे मानण्यात येईल आणि त्यानुसार जेथे समता नाही तेथे ती आणण्यासाठी पक्ष झटेल व जेथे ती नाकारण्यात येते, तेथे ती राबविण्यासाठी लढा देईल.

२) प्रत्येक व्यक्तीचे सुख हा केंद्रबिंदू समजण्यात येईल आणि आपल्या उध्दारास्तव प्रयत्न करण्याची प्रत्येक व्यक्तीस समान संधी मिळेल. शासनसंस्था (स्टेट) हे साध्य मिळविण्यासाठी वापरावयाचे साधन होय.

३) इतर देश बांधवांच्या हक्कांचे व शासन संस्थेच्या आवश्यक तेवढया अधिकाराचे संरक्षण करुन प्रत्येक नागरिकास धार्मिक, आर्थिक, राजकीय स्वातंत्र्य असले पाहिजे असे हा पक्ष मानील.

४) प्रत्येक भारतीय नागरिकांस समान संधीचा अधिकार असल्याचे हा पक्ष मान्य करील. अर्थात, ज्यांना आत्मोन्नतीसाठी कधीच संधी मिळाली नसेल त्यांना संधी मिळालेल्या लोकांपेक्षा अग्रक्रम देण्याचे तत्व पक्ष अंगिकारील.

५) प्रत्येक व्यक्तीस जीवनातील गरजा व भीती यापासून मुक्ती मिळवून देण्याच्या शासन संस्थेच्या कर्तव्याची जाणीव सरकारला हा पक्ष सातत्याने देईल.

६) हा पक्ष स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यांच्या प्रस्थापनेसाठी आग्रह धरील आणि एका माणसाकडून दुसऱ्या माणसाची, एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाची, किंवा एका राष्ट्राची दुसऱ्या राष्ट्राकडून होणारी पिळवणूक व दडपणशाही यांना पायबंद घालील.

७) व्यक्ती व समाज या दोहोंच्या भल्याच्या दृष्टीने संसदीय राज्य-पध्दती ही सर्वोत्तम राज्यपध्दती आहे अशी या पक्षाची श्रध्दा राहील.

(४) लोकशाहीच्या यशस्वीतेचे चौथे कारण म्हणजे, "संविधानात्मक नितीचे पालन करणे होय". लोकशाहीत चांगल्या प्रकारची नितिमत्ता पाळावी लागते. जे संकेत, प्रथा, नियम तयार झालेले असतात. त्याचे पालन करणे सर्वावर बंधनकारक असते. याची अनेक उदाहरणे या पत्रात दिलेली आहेत. व्यक्ती कितीही लोकप्रिय असली तरी तेथे व्यक्तिपुजेला महत्व नसले पाहिजे. सर्वांनीच लोकशाहीच्या आदर्श या पध्दतीप्रमाणे "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया" हा पक्ष निर्माण झाला पाहिजे व हाय पक्ष पुढील प्रकारची कार्ये पाहील.

१) पक्ष स्थापनेसाठी व त्याच्या संघटित वाढीसाठी झटणे आणि पक्षाचे तत्वज्ञान व ध्येयधोरण यांचा प्रचार करणे.

२) पक्षाची विचारसरणी व तत्वे यांचा प्रचार, वृत्तपत्रे, सभा-संमेलन, व्याख्याने वाङ्.मय लेखन इत्यादी मार्गानी करणे.

३) पक्ष सभासदांच्या वतीने संयुक्त चळवळी व राजकीय चळवळी व राजकीय कृती करण्याकरिता निवडणूका लढवणे.

अशा वरील प्रकारची कार्ये पक्षाच्या संघटनेने केली पाहिजेत व या पक्षाचे ध्येय व उद्दिष्टे हे सर्व लोकांना स्वातंत्र्य, समता व बंधुता न्याय मिळावी व देशातील सर्व लोकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य मिळावे व सर्वत्र शांततेचे व सनदशीर राज्य असावे असे ध्येय या पक्षाने

स्वीकारावे व त्यासाठी राज्य घटनेच्या सरनाम्यात जे स्वरूप व उद्दिष्टे स्पष्ट केलेले आहे त्याची अंमलबजावणी करावी. सर्वांना समान न्याय्य, सर्वांना समान संधी, प्रत्येक व्यक्तिला सुख, त्यांच्या हक्कांचे रक्षण, इ. मिळवून देण्याचे उद्दिष्ट या पक्षाचे असेलपाहिजे. तसेच या पक्षाचा विश्वास संसदीय लोकशाहीवर असेल. अशा स्वरूपाचे पत्र "रिपब्लिकन पक्षाचे स्वरूप, उद्दिष्टे, रचना कशा प्रकारे असावी हे स्पष्ट करणारे आहे.

या पत्रावरून आपल्याला पक्षाचे एकंदरीत स्वरूप थोडक्यात समजून येऊ शकते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील हा पक्ष मूर्त स्वरूपात येण्यापूर्वीच त्यांचे निधन झाले. त्यामुळे त्यांच्यानंतर त्यांच्या अनुयायानी या पक्षाची घटना पुढीलप्रमाणे लिहिली.

## भारतीय रिपब्लिकन पक्षाची घटना व जाहीरनामा :

अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची घटना एका घटना समिती मार्फत तयार करण्यात आली. त्यामध्ये सर्वश्री बी.सी. कांबळे, बाबू हरदास आवळे आणि बॅ. खोब्रागडे यासारख्या विद्वान व्यक्तिंचा समावेश केलेला होता. घटना समितीच्या बैठका अकोला, मुंबई व दिल्ली येथे झाल्या. समितीच्या दिल्ली येथील बैठकीत सर्वश्री एन्. शिवराज, आवळे बाबू, बी.सी. कांबळे, ए.जी. पवार व दा.ता. रूपवते हजर होते. या बैठकीमध्ये घटना समितीने तयार केलेली घटना मंजूर करण्यात आली. घटनेचा अंमल १० मार्च, १९५९ पासून झाला. १९५९ च्या घटनेप्रमाणे रिपब्लिकन पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारी मंडळाने आपल्या पाटणा येथील बैठकीमध्ये १६ डिसेंबर, १९६७ ला दुरूस्ती केली. तीच घटना आज अस्तित्वात आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आर.पी.आय.) च्या घटनेमध्ये एकूण २४ कलमे आहेत.

ध्येय आणि उद्देश :

(१) भारतीय घटनेतील सरनाम्यात व्यक्त केल्याप्रमाणे न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता हेच रिपब्लिकन पक्षाचे ध्येय असेल.

(२) रिपब्लिकन पक्ष सर्वांना कायद्यासमोर समान समजले. आणि सर्वत्र समता प्रस्थापित करील. लोकांचे हीत हे साध्य तर राज्य. ते प्राप्त करावयाचे साधन आहे असे समजेल. प्रत्येक भारतीयाला धार्मिक, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य असेल. सर्वांना समान संधी दिली जाईल. मात्र ज्यांना पूर्वी समान संधी नव्हती त्याना पक्ष खास सवलती देण्याचा प्रयत्न करील. पक्ष लोकांच्या गरजा, गुलामी आणि भीती याविषयी करावयाच्या कार्याबद्दल राज्याला सतर्क करील. सर्व प्रकारचे शोषण नष्ट करण्याचा पक्ष प्रयत्न करील. तसेच हा पक्ष व्यक्तिगत व सामाजिक हिताच्या दृष्टिकोनातून सांसदीय लोकशाहीचा पुरस्कार करील.

(३) हा पक्ष अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, बौद्ध व मागासवर्ग यामधील लोकांना संघटित करील. शेतकरी, भूमिहीन, शेतमजूर आणि कारखान्यातील मजूर यानाही संघटीत करील. सर्व अल्पसंख्यांकाना न्याय मिळवून दिला जाईल. आणि लोकांच्या सर्वांगिण विकासासाठी पक्ष सतत प्रयत्नशील राहील.

उपरोक्त उद्देशामध्ये रिपब्लिकन पार्टीने भारतातील सर्व कमकुवत घटकांना, अल्पभुधारकांना, भूमीहीन मजूरांना, श्रमिकांना, अल्पसंख्यांकाना संघटीत करुन त्यांना सामाजिक व आर्थिक न्याय प्राप्त करुन देण्याची बांधिलकी स्वीकारलेली दिसते.

पार्टीची संघटना :

रिपब्लिकन पक्षाची संघटना येणेप्रमाणे असेल -

(१) सभासदत्व : रिपब्लिकन पक्षाचे सभासद दोन प्रकारचे असतील.
अ) प्राथमिक सभासद, ब) क्रियाशील सभासद.

अर्थात ज्या व्यक्तीने आपल्या वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली असतील. ज्यास पक्षाची घटना व नियम मंजूर असतील, जे वर्षासाठी २५ पैसे वर्गणी देऊ इच्छित असतील आणि ज्याने दुस-या कोणत्याही पक्षाचे सभासदत्व स्विकारलेले नसेल. अशा व्यक्तिस रिपब्लिकन पक्षाचे प्राथमिक सभासदत्व प्राप्त होऊ शकते. तसेच ज्या व्यक्तीने वयाची २१ वर्षे पूर्ण केलेली असतील ज्याने एक वर्ष प्राथमिक सदस्य म्हणून काम केलेले असेल आणि जो वार्षिक १ रुपया वर्गणी देऊ इच्छितो अशा व्यक्तिस क्रियाशील सदस्य म्हणून घेतले जाईल. प्रत्येक क्रियाशील सदस्याला वर्षामधून निदान १०० प्राथमिक सदस्य बनवावे लागतील. आणि त्यांच्याकडून पक्षासाठी २५ रुपये जमा करावे लागतील. प्रत्येक क्रियाशील सदस्याला पक्षांतर्गत निवडणूक लढवण्याचा अधिकार असेल.

२) ग्रामस्तरावरील कमिटी :

ग्राम स्तरावर ५ ते ९ सभासदांचे एक मंडळ असेल. त्याची निवडणूक त्याच गावातील क्रियाशील सभासद बहुमताने करतील. ग्राम कमिटी आपल्यातून कार्यकारी मंडळाची निवड करील. तसेच त्याच गावातील अन्य पाच व्यक्तिस को-ऑप. सभासद म्हणून कार्यकाकरिणीवर घेतले जाईल.

३) तालुका किंवा ब्लॉक स्तरावरील कमिटी :

संबंधित तालुका किंवा ब्लॉक मधील सर्व ग्राम कमिटीचे सभासद तालुका

स्तरावरील जनरल कौन्सीलचे सदस्य असतील. जनरल कौन्सिल सर्व सभासदामधूनच एका अध्यक्षाची आणि सेक्रेटरी सोडून अन्य कार्यकारी सभासदांची निवड करील. तसेच तालुका स्तरावरील कार्यकारी मंडळास त्या तालुक्यातील कोणाही पाच सदस्यांत को-ऑप सभासद म्हणून निवड करता येईल.

४) जिल्हा स्तरावरील कमिटी :

संबंधित जिल्हयातील सर्व तालुका स्तरावरील कार्यकारी मंडळाचे सभासद जिल्हा स्तरावरील जनरल कौन्सीलचे सदस्य असतील. जनरल कौन्सिल आपल्या सदस्यामधूनच अध्यक्ष व सेक्रेटरी व्यक्तिरिक्त अन्य कार्यकारी सभासदांची निवड करील. तसेच जिल्हयातील कोणाही पाच व्यक्तिंची को-ऑप. सभासद म्हणून निवड करील. त्याचप्रमाणे संबंधित जिल्हयातील पक्षाचे सर्व आमदार आणि खासदार जिल्हा कार्यकारी मंडळाचे पदसिध्द सदस्य असतील.

५) प्रदेश स्तरावरील कमिटी :

जिल्हा स्तरावरील सर्व कार्यकारी मंडळाचे सभासद प्रदेश स्तरावरील जनरल कौन्सिलचे सभासद असतील. जनरल कौन्सिल अध्यक्षांची व सेक्रेटरी व्यतिरिक्त अन्य कार्यकारी सभासदांची निवड करील. त्यास त्या प्रदेशातील कोणाही पाच सभासदाना को-ऑप सभासद करून घेता येईल. तसेच त्या प्रदेशातील सर्व आमदार व खासदार प्रदेश स्तरावरील कार्यकारी मंडळाचे पदसिध्द सभासद असतील.

६) राज्य स्तरावरील कमिटी :

राज्य स्तरावरील कमिटीमध्ये त्या राज्यातील सर्वप्रदेशांचे अध्यक्ष, सेक्रेटरी पक्षाचे आमदार आणि खासदार राज्यस्तरीय कमिटीचे सभासद असतील राज्य स्तरावरील समन्वय समितीचा एक सेक्रेटरी असेल.

सेक्रेटरीची निवड संबंधित कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षाकडून केली जाईल सर्व पदाधिकारी तीन वर्षांसाठी आपल्या पदावर राहातील.

मध्यवर्ती संघटन :

रिपब्लिकन पक्षाच्या मध्यवर्ती संघटनेमध्ये खालील पदाधिकारी असतील-

१) अध्यक्ष
२) जनरल सेक्रेटरी
३) सेक्रेटरी (जास्तीत जास्त चार)
४) जनरल कौन्सिल
५) मध्यवर्ती कार्यकारी मंडळ.

१) मध्यवर्ती जनरल कौन्सिलमध्ये प्रदेश स्तरावरील सर्व जनरल कौन्सिलचे सभासद असतील.

२) मध्यवर्ती जनरल कौन्सिल पक्षाच्या अध्यक्षाची निवड करील.

३) अध्यक्ष आपल्या स्वत:च्या अधिकारात एका जनरल सेक्रेटरीची व अन्य जास्तीत जास्त चार सेक्रेटरींची नियुक्ती करील.

४) पक्षाध्यक्ष मध्यवर्ती कार्यकारी मंडळाचे संघटन करील.

मध्यवर्ती कार्यकारी मंडळाच्या निम्मे सदस्य प्रदेश स्तरावरील अध्यक्ष किंवा सेक्रेटरी असतील. प्रत्येक प्रदेशामधून निदान प्रतिनिधी मध्यवर्ती कार्यकारी मंडळावर असणे जरुरीचे आहे. तसेच पक्षाचे मंत्री आणि खासदार पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारी मंडळाचे पद्सिध्द सभासद असतील. त्याचप्रमाणे मध्यवर्ती कार्यकारी मंडळाला जास्तीत जास्त सात सभासदांना को-ऑप म्हणून घेण्याचा अधिकार असेल.

सर्व पदाधिका-यांच्या कार्यकाळ तीन वर्षाचा असेल. पक्षाचे सर्वसाधारण अधिवेशन दोन वर्षातून एकदा पक्षाने ठरविलेल्या वेळी व स्थळी भरेल आणि १/५ सदस्यांच्या विनंतीनुसार पक्षाचे खास अधिवेशन भरेल. पक्षाचे कामकाज चालविण्यासाठी कमीत कमी १/३ सदस्य अधिवेशनाला उपस्थित रहाणे जरुरीचे आहे.

पक्षाचे मध्यवर्ती कार्यकारी मंडळ पक्षाचे प्रमुख असेल ते जेंव्हा अधिवेशनात नसेल तेंव्हा पक्षाध्यक्ष कार्यकारी मंडळाची जागा घेईल. मध्यवर्ती कार्यकारी मंडळाला पक्षाचे ध्येयधोरण ठरविण्याचा, पक्षाच्या शिस्तीसंबंधी नियम बनविण्याचा, शिस्तभंगाची कारवाई करण्याचा अधिकार असेल.

पक्षाला प्राप्त झालेली सर्व रक्कम पक्षाच्या नावावर बँकेमध्ये ठेवली जाईल आणि त्या संबंधी अध्यक्ष, सेक्रेटरी आणि कोषाध्यक्ष जबाबदार असतील.

प्रत्येक शाखा आपल्या पेक्षा उच्च शाखेला आपल्या कार्याचा वार्षिक अहवाल प्रकाशित करील.

उमेदवाराची निवड :

संसदेच्या व विधानसभांच्या निवडणुकामध्ये पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून भाग घेणा-या उमेदवाराची निवड करण्यासाठी एक "निवड मंडळ" असेल. त्यामध्ये पक्षाध्यक्ष व अन्य सहा सभासद असतील. उमेदवाराची निवड करत असताना स्थानिक शाखांनी केलेल्या शिफारशी निवड मंडळ विचारात घेईल.

पक्षाचा झेंडा :

रिपब्लिकन पक्षाचा ध्वज निळा असेल. तो चौकोनी असून त्याच्या

लांबी-रुंदीचे प्रमाण ३:२ असे असेल. त्याच्या मध्यभागी पांढ-या रंगातील अशोकचक्र असेल.

पक्षशिस्त नियम :

पक्षाच्या कोणत्याही सभासदाने खालील पैकी कोणताही गुन्हा केल्यास त्यावरशिस्तभंगाची कार्यवाही केली जाईल.

१) पक्षाच्या ध्येय-धोरणाविरुध्द वर्तन केल्यास.
२) पक्षाच्या ध्येयधोरणावर उघडपणे टिका केल्यास.
३) पक्षांतर्गत गटबाजी केल्यास.
४) एखाद्या सभासदाची बदनामी केल्यास.
५) पक्षाच्या कामकाजामध्ये अडथळा केल्यास.
६) पक्षाच्या पैशाचा गैरव्यवहार किंवा अपहार केल्यास.
७) दुस-या पक्षामध्ये प्रवेश केल्यास.
८) पक्षाच्या अपयशाबद्दल स्वत: कारणीभूत ठरल्यास.
९) पक्षाच्या अधिकृत उमेदवारास विरोध केल्यास.

कोणत्याही सभासदाविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही संबंधित प्रदेश स्तरावरील शाखा करु शकेल. अर्थात ज्याच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही केली गेली असेल आणि शिक्षा झाली असेल अशा सभासदास मध्यवर्ती कार्यकारी मंडळाकडे अर्ज दाखल करता येईल. मध्यवर्ती कार्यकारी मंडळाचा निर्णय अंतीम व बंधनकारकअसेल.

ज्या सभासदाने किंवा पदाधिका-यांने शिस्तभंग केला असेल त्यास पक्षामधून काही काळासाठी किंवा नेहमीकरिता काढून टाकले जाईल.

पक्षाध्यक्षाला वेळप्रसंगी आपल्या अधिकारामध्ये एका हंगामी

मध्यवर्ती कार्यकारी मंडळाची नियुक्ती करण्याचा अधिकार असेल. अशा हंगामी कार्यकारी मंडळामध्ये जास्तीत जास्त पंधरा सभासद असतील. रिपब्लिकन पक्षाच्या घटनेतील तरतुदींना अंमलात आणण्याचा हंगामी कार्यकारिणीस अधिकार राहील.

वरील प्रकारची घटना ही घटना समिती निर्माण करून तयार केलेली आहे. ही घटना अतिशय विस्तृत व स्पष्टपणे लिहिली आहे. या घटनेमध्ये अनेक गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. निर्माण झालेला पक्ष लोकप्रिय होण्यासाठी शिस्तबध्द स्वरूपाची ही घटना निर्माण करण्यात आली. या घटनेमध्ये एकूण २४ कलमे आहेत.

या घटनेचे ध्येय आणि उद्दिष्टे स्पष्ट स्वरूपात दिली आहेत. भारतीय राज्यघटनेमध्ये जी उद्देशपत्रिका दिलेली आहे त्यानुसार या पक्षाने आपले ध्येय व उद्दिष्ट निश्चित केले आहे. डॉ. आंबेडकरांनी जनतेला उद्देशून लिहिलेल्या पत्रात सुध्दा पक्षाचे ध्येय व उद्दिष्ट निश्चित केले होते. त्याच स्वरूपात रिपब्लिकन पक्षाने सुध्दा ध्येय निश्चित केले आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता ही लोकशाहीची मुलभूत तत्वे म्हणजेच रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख ध्येय आहे. देशात आदर्श लोकशाही निर्माण व्हावी व सर्व लोकांना लोकशाहीची फळे मिळावीत यासाठी या पक्षाने सुध्दा हेच ध्येय निश्चित केले आहे.

रिपब्लिकन पक्ष हा सर्वांना समता प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करेल. आर्थिक, धार्मिक व राजकीय बाबतीत सर्व लोकांना चांगल्या प्रकारचे हक्क व स्वातंत्र्य मिळावे हा प्रयत्न पक्ष करेल. यासाठी देशात जी विषमता निर्माण झालेली आहे. ती नष्ट करून सर्वांना सर्व क्षेत्रात समान संधी उपलब्ध करून

दिली जाईल. शोषित झालेल्या समाजाला विशेष सवलती देऊन हा पक्ष त्यांना समानतेवर आणण्याचा प्रयत्न करेल. व हे पक्षाचे प्रथम उद्दिष्ट असेल असे घटनेत स्पष्ट केले आहे.

हा पक्ष सर्व मागासलेल्या जाती-जमातींना एकत्र करून व मजुरांना देखील एका पक्षाच्या झेंडयाखाली आणून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करेल.

हा पक्ष मजबूत व्हावा व पक्ष टिकून रहावा यासाठी या पक्षाची मजबूत संघटना निर्माण केली आहे. या पक्षाच्या सभासदत्वाचे सर्वप्रथम त्यांनी दोन प्रकार केले आहेत. प्राथमिक सभासद व क्रियाशील सभासद असे सभासदांचे दोन प्रकारे विभाजन करून त्यांची वार्षिक वर्गणी निश्चित केली आहे व कोणत्या सभासदाला प्रत्यक्षात निवडणूकीला उभा रहाता येईल हे सुध्दा निश्चित केले आहे.

तसेच या पक्षसंघटनेचे ग्रामीण विभाग, तालुका विभाग, जिल्हा विभाग, राज्य विभाग व मध्यवर्ती विभाग कशा प्रकारचे असतील व त्यामध्ये कोणत्या प्रकारे सभासद नेमता येतील हे निश्चित केले आहे. तसेच त्या सदस्यांचे नियम, त्यानी पाळावयाच्या अटी, त्यांनी करावयाचे कार्य त्याचे अधिकार निश्चित केले आहेत.

पक्षाचे वार्षिक व खास अधिवेशन कसे व कधी भरवावे व त्यासाठी संघटनेवर कोणत्या जबाबदाऱ्या आहेत हे सुध्दा निश्चित केले आहे.

पक्ष सभासदावर पक्ष भंगाची कोणती व कशी कारवाई करावी हे स्पष्टपणे घटनेत नमुद केले आहे. सार्वत्रिक निवडणूकीत आमदार व खासदार यांच्या निवडणूकीत कोणत्या उमेदवाराला उभे रहाता येईल हे घटनेत स्पष्ट आहे.

पक्षाचा झेंडा कशाप्रकारे असेल त्यांची रचना कशी असेल हे सुध्दा सविस्तरपणे घटनेत लिहिले आहे. पक्षशिस्तीचे नियम व त्यांची अंमलबजावणी याविषयी सुध्दा स्पष्टपणे घटनेत उल्लेख आहे.

अशा अनेक लहान-मोठया बाबी पक्षाच्या घटनेत स्पष्टपणे लिहून ठेवलेल्या आहेत. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाची ही घटना अतिशय परिपूर्ण व अर्थपूर्ण आहे असे आपणास दिसते. पक्षाची घटना जेवढी परिपूर्ण असते व पक्षाच्या घटनेनुसार पक्षातील लोक जेवढया प्रमाणात सहकार्य करतात व पक्षाच्या घटनेचे पालन करतात त्यावर राजकीय पक्षाचे यश-अपयश अवलंबून असते. त्यामुळे १० मार्च, १९५९ रोजी निर्माण झालेली ही परिपूर्ण पक्षाची घटना चांगल्या प्रकारे आदर्श स्वरुप अशीच ही घटना आहे. या घटनेत सर्वच तपशील अगदी विस्ताराने व स्पष्ट भाषेत लिहिला आहे. सध्या रिपब्लिकन पक्षाची हिच घटना आज अस्तित्वात आहे. इतर पक्षांच्या तुलनेने रिपब्लिकन पक्षाची घटना ही परिपूर्ण व व्यापक स्वरुपाची घटना आहे. या घटनेनुसार रिपब्लिकन पक्षाने १९६२ च्या निवडणूका लढविण्याचा निर्णय घेतला व १९६२ साली एक आदर्श व परिपूर्ण असा जाहीरनामा निर्माण करुन व प्रकाशित करुन १९६२ च्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणूका या रिपब्लिकन पक्षाच्या नावाखाली लढवल्या गेल्या होत्या. रिपब्लिकन पक्षाच्या दृष्टीने १९६२ ची सार्वत्रिक निवडणूक म्हणजे त्यांची ही पहिलीच निवडणूक होती. त्यामुळे त्यांनी मोठा व सविस्तर असा पुढील प्रकारचा जाहीरनामा प्रसिध्द केला होता.

१९६२ च्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी या प्रकारचा आदर्श जाहीरनामा प्रसिध्द झाला. या जाहीरनाम्यात पहिल्या कलमात रिपब्लिकन पक्षाने अशोकचक्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व लोकसत्तेला अभिवादन करुन जाहीरनाम्याची सुरवात केली आहे. रिपब्लिकन पक्षाच्या मते संपूर्ण भारतात बौध्द धम्माचा संदेश पोहचला तर देशाचे ऐक्य टिकून देश वैभवशाली होईल असा या पक्षाला विश्वास वाटतो. म्हणून सर्वप्रथम बौध्द धम्माचा प्रसार करणे हे रिपब्लिकन पक्षाचे धोरण आहे

दुस-या कलमात रिपब्लिकन पक्षाने इतर पक्षाबाबत खंत व्यक्त केली आहे. कारण इतर देशातील प्रथेनुसार, राज्यघटना, शासनसंस्था, शासन-पध्दती, घटनाकार यांना प्रत्येक पक्षाने आदर्शवत मानावयाचे असते व त्यांचा मान राखून त्यांचा आदर करायचा असतो. परंतु भारतातील रिप-ब्लिकन पक्षाशिवाय इतर राजकीय पक्ष असा आदर राखत नाहीत. तरी सर्व राजकीय पक्षानी घटनेने निर्माण केलेल्या आदर्श संस्थेचा आदर करावा असे अवाहन रिपब्लिकन पक्ष करीत आहे.

तिस-या कलमात मतदाराना अवाहन करून सांगितले आहे की, मत-दारांच्या मतावरच सरकारचे किंवा पक्षाचे यश अवलंबून असते त्यामुळे मत-दारांनी मतदान करतांना योग्य व गंभीरपणे विचार करून आपला अधिकार बजावला पाहिजे असे अवाहन या पक्षाने केले आहे.

जाहिरनाम्याच्या चौथ्या कलमात रिपब्लिकन पक्षाने मतदानाच्या बाबतीत एक निष्कर्ष काढलेला आहे की, तो म्हणजे मतदानाच्या दिवशी सर्व मतदारानी आपल्या मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. कारण, मतदान करणे म्हणजेच गरिबी व गुलामगिरी या विरूध्द आपले मत नोंदवणे असा याचा अर्थ असतो म्हणून प्रत्येक मतदाराने आपला मतदानाचा हक्क हा बजा-वलाच पाहिजे.

जाहीरनाम्याच्या ५ व्या कलमात रिपब्लिकन पक्षाने आपले तत्व व सिध्दांत देण्याचा प्रयत्न केला आहे. रिपब्लिकन पक्षाचे तत्वज्ञान थोडक्यात असे आहे की,

१) देशाच्या उत्कर्षासाठी या पक्षाला लोकशाही देशात टिकून रहाणे आवश्यक वाटते.

२) देशाच्या कायदेमंडळात ख-या अर्थाने लोकप्रतिनिधी असावेत असे या पक्षाला वाटते.

३) या पक्षाला परंपरागत असणारी सत्ता अमान्य आहे आणि त्या ऐवजी संसदीय लोकशाही पध्दतीवर आधारित व लोकांच्याकडून, लोकांच्यासाठी चालविले जाणारे सरकार असावे असे या पक्षाला वाटते.

४) देशाच्या सरहद्दचे रक्षण हे लोकांच्या कडूनच झाले पाहिजे असे या पक्षाला वाटते.

५) परराष्ट्राशी व इतर शेजारील देशाबरोबर भारताने चांगले संबंध प्रस्थापित करावेत असे या पक्षाचे तत्व आहे.

वरील तत्वाला अनुसरून हा पक्ष आपली धोरणे निश्चित करेल असे या कलमात म्हटले आहे. तर -

सहाव्या कलमात रिपब्लिकन पक्षाने कोणत्या तत्वांचा स्विकार केलेला आहे याचे स्पष्टीकरण मतदारांना समजावे म्हणून रिपब्लिकन पक्षाने दिले आहे.

१) रिपब्लिकन पक्षाला कोणत्याही प्रकारची गुलामगिरी ही निंद्य वाटते. या पक्षाने गुलामगिरीचा तिरस्कार केला आहे आणि त्यासाठी सर्व प्रकारचा जुलूम किंवा अन्याय रिपब्लिकन पक्ष नष्ट करेल.

२) लोकशाहीचे मुलभूत तत्व म्हणजे स्वातंत्र्य, समता व बंधुता या तीन गोष्टींचे रक्षण करून सर्व प्रकारची पिळवणूक नष्ट करण्याचा प्रयत्न हा पक्ष करेल.

३) विषमता नष्ट करुन सर्वत्र समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न रिपब्लिकन पक्षा करेल.

४) रिपब्लिकन पक्षा सर्व लोकांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य उपभोगास मिळावे यासाठी प्रयत्न करेल. त्याचबरोबर घटनेच्या सुरक्षिततेसाठी या स्वातंत्र्यावर रिपब्लिकन पक्षा योग्य ती बंधने आणेल.

५) प्रत्येक व्यक्तिला त्याच्या कुवतीनुसार त्याला विकासाची संधी मिळवून देण्याची हमी रिपब्लिकन पक्षाने घेतली आहे.

६) प्रत्येक व्यक्तिला विकास करण्यासाठी समान संधी मिळवून दिली जाईल व ज्यांना पूर्वी समान संधी मिळालेली नव्हती त्यांना अधिक संरक्षण व सवलती देऊन त्यांना विकास करण्याची संधी हा पक्षा मिळवून देईल.

७) प्रत्येक भारतीय नागरीकाला देशात निर्भयपणे रहाता येईल अशी परिस्थिती हा पक्षा निर्माण करेल.

८) संसदीय लोकशाही पध्दतीवर या पक्षाचा विश्वास असेल.

९) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कल्पनेप्रमाणे "भाषिकराज्ये" असावीत ही त्यांची कल्पना रिपब्लिकन पक्षाला मान्य आहे.

वरील प्रकारची आदर्श स्वरुपाची तत्वे रिपब्लिकन पक्षाने निश्चित केली होती. लोकशाही संस्थाचे आदर्श रितीने पालन व्हावे. देशातील सर्व लोकांचा समान पध्दतीने विकास व्हावा व सर्व लोकांना त्यांचे हक्क, अधिकार व स्वातंत्र्य मिळून त्यांनी स्वतःचा व देशाचा सर्वांगिन विकास करावा यासाठी या पक्षाने वरिल प्रकारची तत्वे स्विकारली.

जाहीरनाम्याच्या ७ व्या व ८ व्या कलमात असे म्हटले आहे की, कोणत्याही पक्षाने आमच्या पक्षासारखी राजकीय तत्वे जाहीर केली नाहीत. तसेच आम्ही जाहीर केलेली तत्वे ही अंत:करणातून स्वीकारलेली आहेत असे रिपब्लिकन पक्ष म्हणतो.

९ व्या कलमात या रिपब्लिकन पक्षाचे धोरण कोणत्याही इझमला धरुन असणार नाही. परंतु त्यातील चांगली तत्वे हा पक्ष स्विकारेल व जनतेला आर्थिक व सामाजिक कल्याण प्राप्त करुन देईल.

राष्ट्रीय ऐक्याबाबत दहाव्या कलमात असे स्पष्ट केले आहे की, जो पर्यंत सर्व भारतीय लोक एक आहेत अशी भावना जोपर्यंत निर्माण होत नाही तोपर्यंत राष्ट्रीय एकात्मता साध्य होणार नाही. ती साध्य करावयाची असेल तर एकच न्यायमंडळ, नागरिकत्व, एकच सनदी भारतीय नोकरवर्ग, हिंदी भाषेचा वापर, धर्मातीत राज्या या तत्त्वांचा काटेकोरपणे अंमल केल्यास राष्ट्रीय एकात्मता ख-या अर्थाने निर्माण होईल असे रिपब्लिकन पक्षाला वाटते व देशाचे ऐक्य टिकून रहाण्यासाठी अनावश्यक असणारे कायदे रद्द केले पाहिजेत असे या पक्षाला वाटते.

१२ व्या कलमात द्रविड-नाद या चळवळीबाबत रिपब्लिकन पक्ष संपूर्ण पणे लक्ष घालून त्यात चांगल्या प्रकारे मार्ग काढला जाईल असे आश्वासन रिपब्लिकन पक्षाने दिले आहे.

कलम १३ मध्ये रिपब्लिकन पक्षाने आपले अल्पसंख्याकाबाबतचे मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते अल्पसंख्यांकाचे प्रश्न, त्यांची समस्या यावर तोडगा निघाला पाहिजे व चांगल्या प्रकारचा तोडगा रिपब्लिकन पक्ष काढेल असे आश्वासन दिले आहे.

जाहीरनाम्याच्या १४ व्या कलमात घटक राज्यांच्या सीमेबाबत जे तंटे किंवा समस्या आहेत त्याबाबत केंद्राला स्पष्ट अधिकार असुनही कॉंग्रेस सरकार या अधिकारांचा वापर करीत नाही. घटकराज्ये निर्माण करणे, त्यांच्या सीमा बदलणे हे अधिकार केंद्राचे असूनदेखिल कॉंग्रेस या अधिकारांचा वापर करीत नाही. त्यामुळे हा पक्ष कॉंग्रेसचा निषेध व्यक्त करीत आहे.

१५ व्या कलमात जे घटकराज्यांच्या बाबत तंटे किंवा समस्या निर्माण झालेल्या आहेत त्या सोडविण्याबाबत रिपब्लिकन पक्ष असे तंटे सोडविण्याबाबत राज्य घटनेतच तशी स्पष्ट तरतूद करणे अशा उपाययोजना रिपब्लिकन पक्ष अंमलात आणेल.

पक्षाच्या एकंदरीत कार्यक्रमाबाबत जाहिरनाम्यात १६ व्या कलमात निरनिराळे मुद्दे व्यक्त केले आहेत. या पक्षाला कार्यक्रम कोणते असतील हे १६, १७ व १८ व्या कलमात स्पष्ट केले आहे. पार्लमेंटशी सुधारणा करण्यासाठी रिपब्लिकन पक्षाला असे दिसून आले आहे की ख-या अर्थाने लोकांचे प्रतिनिधी लोकसभेत निवडले जात नाहीत. त्यामुळे राजकीय समतोल बिघडलेला आहे. लोकसभेतील बिघडलेला हा असमतोल दुर करण्यासाठी रिपब्लिकन पक्ष हा खालील प्रकारच्या मागण्या करेल.

१) पाचू लनिवडणूक पध्दती ही संपूर्णपणे तपासून घेऊन या निवडणूक प्रक्रियेत जर दोष असेल तर त्यात सुधारणा करून ख-या अर्थाने जनतेने प्रतिनिधी सभागृहात कसे निवडले जातील त्या पध्दतीचा वापर करण्याचा पुरस्कार रिपब्लिकन पक्ष करेल.

२) प्रत्येक राजकीय पक्षाला संसदेत आपले मत स्पष्टपणे मांडण्यासाठी व त्यांना समान संधी मिळण्यासाठी संसदिय कायद्यात थोडे बदल करण्याचा

या कमिशनमुळे जे रोजगार व नोकऱ्या निर्माण झाल्या त्यात जातीचा समतोल सांभाळला गेला नाही त्यामुळे त्यात दोष निर्माण झाले आहेत असे रिपब्लिकन पक्षाला वाटते.

मागासवर्गाच्या कल्याणाबाबत २२ व्या कलमात नमुद केले आहे की, भारतीय घटनेप्रमाणे सध्याच्या सरकारने मागासवर्गीय कोण ? हे निश्चित न केल्यामुळे मागासवर्ग व पुढारलेले वर्ग यांच्यात विषमता वाढत चाललेली आहे. ही विषमता कमी करावयाची असेल तर मागासवर्गांना अधिक संधी देऊन समानता निर्माण केली पाहिजे व यासाठी रिपब्लिकन पक्ष मागासवर्गाला शिक्षणात व नोकरीत जास्त संधी मिळावी असा आग्रह धरेल.

दारिद्र्याचा प्रश्नाबाबत २३व्या कलमात रिपब्लिकन पक्षाने असे म्हटले आहे की, प्लॅनिंग कमिशनला देशातील दारिद्र्य नष्ट करण्यास अपयश आले आहे. दारिद्र्यामुळे गुलामगिरी निर्माण होते. त्यामुळे ही गुलामगिरी नष्ट करण्यासाठी रिपब्लिकन पक्षाने निरनिराळया सुचना या कलमात केल्या आहेत. त्यात गरिबीचा अभिमान बाळगू नये, संतती-नियमतासाठी सर्वांना मोफत साधने पुरवावीत अशा सुचना केल्या आहेत व अधिक उत्पादनाच्या कोणत्याही योजनेत रिपब्लिकन पक्ष सहकार्य करेल असे वचन दिले आहे.

देशातील शेती विषयी २५ व २६ व्याक कलमात निरनिराळे मुद्दे मांडले आहेत. सध्याची शेती व्यवस्था ही चुकीची असल्यामुळे रिपब्लिकन पक्षाने निरनिराळे उपाय या कलमात सुचवले आहेत.

१) शेतीचे राष्ट्रीयकरण करावे .
२) शेती संयुक्तपणे करावी.
३) प्रत्येकाला समान पध्दतीने शेतीचे वाटप करावे.

४) शेतीला आवश्यक वस्तुंचा पुरवठा सरकारणे करावा.

५) शेतक-याला नुकसान भरपाईची तरतूद करावी.

अशा सुचना मांडल्या आहेत.

मजूर कार्याच्याबाबत २७ व्या व २८ व्या कलमात असे स्पष्ट केले आहे की, मजुरांच्या कार्यक्षम संघटना असाव्यात. यासाठी रिपब्लिकन पक्ष मजूर संघटनेच्या कार्यात लक्ष घालेल व त्यांच्यात उत्साह निर्माण होईल. अशा योजना काढल्या जातील व अंतिमत: मजूरांचे सरकार देशामध्ये येईल असा प्रयत्न रिपब्लिकन पक्ष करेल.

लोकशाहीच्या संरक्षणासाठी २९ व्या कलमात असे सांगितले आहे की, देशातील लोकशाही सुरक्षित रहावी यासाठी हा पक्ष रिपब्लिकन पक्ष देशातील कम्यूनिष्ट विचारसरणीला तोंड देईल, पंतप्रधानाला वास्तव सभा दिली जाईल, पंतप्रधान हा फक्त दोन वेळाच सत्तेवर असावा यासाठी कायदा केला जाईल असे निरनिराळे प्रयत्न हा पक्ष करेल.

देशातील सर्व प्रकारची अस्पृश्यता नष्ट होण्याकरिता ३० व्या कलमाप्रमाणे रिपब्लिकन पक्ष निरनिराळे उपाय अमलात आणेल.

लाचलूचपत व काळाबाजार यावर नियंत्रण घालण्यासाठी ३१ व्या कलमाप्रमाणे रिपब्लिकन पक्ष अतिशय कटाक्षाने यावर आळा घालण्याचा प्रयत्न करेल व लक्ष ठेवेल.

धार्मिक स्वातंत्र्याच्या बाबत ३२ व्या कलमाप्रमाणे रिपब्लिकन पक्ष कोणत्याही धार्मिक पक्षाबरोबर हा पक्ष संबंध ठेवणार नाही.

राजकीय पक्षाबाबत ३३ व्या कलमाप्रमाणे सर्व देशातील लोकांना राजकीय पक्षाबाबत व राजकीय शिक्षण देण्याचा प्रयत्न रिपब्लिकन पक्ष करेल असे आश्वासन दिले आहे.

शिक्षण व्यवस्थेबाबत ३४ व्या कलमात रिपब्लिकन पक्ष हा शिक्षणाचा दर्जा वाढविण्याचे प्रयत्न करेल व प्राथमिक ते सर्व उच्च शिक्षण सरकारी खर्चाने असावे असा आग्रह रिपब्लिकन पक्ष धरेल.

बौध्दांच्या घटनात्मक हक्काबाबत हा पक्ष रिपब्लिकन पक्ष सरकारबरोबर झागडत राहिल.

परराष्ट्रीय धोरणाबाबत ३६, ३७, ३८, ३९ व ४० या कलमात अनेक सुधारणा करण्याचा निश्चय रिपब्लिकन पक्षाने केला आहे.

चिनी आक्रमकांच्या बाबतीत सुध्दा ४१ व ४२ व्या कलमात स्पष्टपणे विचार मांडलेले आहेत.

४३ व्या कलमात रिपब्लिकन पक्ष स्थापने अगोदरचा ऐतिहासिक आढावा घेतलेला आहे व त्याप्रमाणे खरा विरोधी पक्ष निर्माण करण्याचे कार्य या पक्षाने आखले आहे.

४४ व्या कलमात निवडणूक फंडाबाबत मतदारांना (पक्षाच्या सभासदांना) अवाहन केले आहे व शेवटी मतदारानी रिपब्लिकन पक्षाला निवडणूकीत मतदान करून सेवेची संधी दयावी अशी मतदारांना विनंती केली आहे.

वरील जाहिरनाम्यावरून अनेक बाबी स्पष्ट होतात. अशा स्वरूपाचा व्यापक असा जाहीरनामा कोणत्याही पक्षात आढळून येत नाही.

<u>रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया : जाहीरनामा</u>

दि. ६ जानेवारी, १९९० रोजी शिवाजी पार्क, मुंबई येथील झालेल्या खुल्या अधिवेशनातील जाहीरनामा -

(१) मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यात येईल.

(२) लागवडीखालील आणलेल्या गायरान, जंगल, पडिक जमीनी, भूमिहीन शेतमजूरांना सामुहिकरित्या कसायला देण्यात येतील. त्यासाठी लागणारे भांडवल, अवजारे व पाणी यांची सोय करण्यात येईल.

(३) शेती हा राष्ट्रीय उद्योग गणला जाईल.

(४) भुमिहिनासह पाण्याचे समान वाटप करण्यात येईल. विशेषत: पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाबाबत अग्रक्रमाने सोडविण्यात येतील.

(५) महाराष्ट्रातील महार वतनाच्या जमीनी, शोषनाच्या कोणत्याही प्रकारे हस्तांतरित झालेल्या जमीनी पूर्ववत वतनदारांना प्राप्त व्हाव्यात असा कायदा करण्यात येईल.

(६) आदिवासी, दलित, भटके, विमुक्तांना व स्त्रियांना जाचक वाटणारे कायदे रद्द करून शेतमजूरांना न्याय हक्काचा राष्ट्रीय कायदा करण्यात येईल.

(७) सर्वांना मोफत शिक्षण देण्यात येईल. तसेच शिक्षण क्षेत्रातील विषमता दूर करून समान शिक्षण पध्दत अवलंबिण्यात येईल व सोळा वर्षाखालील मुलांना व मुलींना शिक्षण सक्तीचे करण्यात येईल.

(८) इनकम टॅक्स (उत्पन्न कर) भरण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेली १८ ह. रुपये मर्यादा ३० ह. रुपये पर्यंत करण्यात येईल.

(९) रोजगाराचा हक्क हा मुलभूत अधिकार म्हणून त्याचा घटनेत समावेश करण्यात येईल.

(१०) बौध्दांना व धर्मांतरित अनुसूचित जाती-जमातीना पूर्वी मिळणारे घटनात्मक संरक्षण देऊन देशभर त्यांना शैक्षणिक व नोकरी विषयक हक्क दिले जातील.

(११) अनुसुचित जाती-जमाती व बौध्द यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांना पायबंद बसेल असा सर्वंकष कायदा करण्यात येईल.

(१२) अनुसुचित जाती-जमाती यांना प्राप्त झालेले घटनात्मक संरक्षण काटेकोरपणे आमलात येण्याकरिता खास कायदा करण्यात येईल.

(१३) भटक्या विमुक्तांना जगण्याचे साधन व पक्की घरे देऊन त्यांना प्रस्थापित करण्यात येईल.

(१४) झोपडपट्टी वासीयांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन त्यांना स्वस्त आणि पक्की घरे देण्यात येतील. त्यासाठी त्यांना सुलभ व्याजाने १०० टक्के कर्ज देण्यात येईल.

(१५) स्त्रियांना समान संधी व रोजगाराची विशेष उपलब्धता करण्यात येईल. तसेच सज्ञान मुलींना आईवडिलांच्या संबंधित समान वाटा असणारा कायदा करुन तिला मिळालेल्या वाटपाचा विनियोग करण्याचा अधिकार तिला देण्यात येईल. तसेच नवऱ्याच्या संपत्तीतील समान हिस्सा देण्यात येईल.

(१६) कुमारी मातांना व अपत्यांना पूर्ण संरक्षण व न्याय मिळेल असा कायदा करण्यात येईल.

(१७) मंडल आयोगाची अंमलबजावणी करण्यात येईल.

(१८) अनुसुचित जाती व जमाती व बौध्द यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांना पायबंद बसेल असा सर्वंकष कायदा करण्यात येईल.

(१९) आजारी गिरण्या व कारखाने ताब्यात घेऊन ते पूर्ववत सुरू करण्यात येतील. कामगारांना नुकसान भरपाई व निर्वाह भत्ता दिला जाईल.

(२०) बंद पडलेल्या कारखान्याची किंवा गिरणीखालील जमीन मालकांना विकण्याची परवानगी देणार नाही.

(२१) असुरक्षित कामगारांना संरक्षण मिळेल अशा कायदेशीर तरतुदी करण्यात येतील.

(२२) सफाई कामगारांना डोक्यावरून मैला वाहून नेण्याची पध्दत बंद करण्यात येऊन त्यांच्यासाठी विकासाच्या खास योजना राबविण्यात येतील.

(२३) जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती रोखण्यात येतील.

(२४) राष्ट्रीय एकात्मता व धर्मनिरपेक्षता यांना धक्का लावणाऱ्या जातीय व धर्मांध शक्तीचा बिमोड करण्यात येईल.

(२५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेली समताधिष्ठित अर्थ-व्यवस्था अमलात आणून वर्गविहीन, वर्णविहीत समाज निर्माण करण्याचे आमचे ध्येय राहील.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या आजच्या खुल्या अधिवेशनात आम्ही हा जाहीरनामा जनतेसमोर मंजूरीसाठी ठेवत आहोत. जनतेने त्याचे स्वागत करून मंजूरी द्यावी.५

(निमंत्रक - ॲड. प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले, स.सु. गवई)

१९९० साली मुंबईत सर्व रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य घडून आले होते. १९९० साली ज्या निवडणूका जाहीर झाल्या होत्या. या निवडणूकीसाठी रिपब्लिकन पक्षाने खुल्या अधिवेशनात आदर्शवत असा जाहीरनामा सादर केला होता. त्या जाहीरनाम्यात पक्षाच्या वतीने जनतेला पुढील आश्वासने दिली होती.

१) मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात येईल असे अभिवचन या पक्षाने दिले. कारण १९७८ साली महाराष्ट्राच्या दोन्ही सभागृहात मंजूर झालेल्या ठरावाची अंमलबजावणी झालेली नव्हती. त्यामुळे हा प्रश्न देशातील संपूर्ण दलित जनतेच्या अस्मितेचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे जाहीरनाम्यात सर्वप्रथम हे आश्वासन देण्यात आले. १४ जानेवारी, १९९४ रोजी सर्व दलित संघटना सर्व रिपब्लिकन पक्षातील गट यांच्या प्रयत्नामुळे मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला.

२) लागवडी खालील आणलेल्या गायरान, पडिक, जंगल, जमीनी, भुमीहिन शेतमजुरांना सामुहिकरित्या कसायला देण्यात येतील. त्यासाठी लागणारे भांडवल अवजारे व पाणी यांची सोय करण्यात येईल असा दुसरा ठराव करण्यात आला होता. रिपब्लिकन पक्षाने पूर्वी भुमिहिनासाठी फार मोठा सत्याग्रह केला होता. त्यावेळी त्यांचे प्रश्न सोडविण्याचे देखील आश्वासन सरकारने दिले होते. परंतु त्याची अंमलबजावणी सरकारने केली नव्हती. म्हणून हे आश्वासन दिले होते. त्याच बरोबर गायरान पडिक जमिनीवर काही दलितांनी आक्रमण केले होते. त्यामुळे त्यांच्या संरक्षणासाठी महाराष्ट्रातील रिपब्लिकन पक्षाने (आठवले गट) प्रयत्न करून त्यांना संरक्षण दिले होते.

३) <u>शेती हा राष्ट्रीय उद्योग गणला जाईल :</u>

डॉ. आंबेडकरांनी देशातील शेतीचे राष्ट्रीयीकरण करावे असा विचार मांडलेला होता. कारण खाजगी शेतीमुळे कुळ, शेतमजूर, यांच्या समस्या निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे या क्षेत्रातील विषमता कमी होऊन दलितांना व मागासलेल्या वर्गांना शेतीचा फायदा व्हावा म्हणून शेतीला राष्ट्रीय उद्योगाचा दर्जा मिळवून दिला जाईल हे आश्वासन दिले.

४) महाराष्ट्रातील महार वतनाच्या जमीनी, शोषणाच्या कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत झालेल्या जमीनी पूर्ववत वतनदारांना प्राप्त व्हाव्यात असा कायदा करण्यात येईल. असे आश्वासन या पक्षाने दिले. कारण महार लोकांच्या जमीनी या दारिद्र्यामुळे, अज्ञानामुळे व सावकारी कर्जामुळे गहान पडलेल्या होत्या आणि विकल्या गेल्या होत्या. त्याना त्या परत मिळाव्यात व त्यांना आर्थिक स्थिरता मिळावी म्हणून हे आश्वासन दिले होते.

५) भुमिहिनासह पाण्याचे समान वाटप करण्यात येईल. विशेषत: पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अग्रक्रमाने सोडवला जाईल. पाणी वाटपातील विषमता दूर करण्यासाठी व पिण्याचे पाणी जनतेला चांगल्याप्रकारे उपलब्ध होण्यासाठी ताबडतोबीने हा प्रश्न सोडविण्याचे वचन या पक्षाने दिले होते.

६) आदिवासी, दलित, भटके, विमुक्तांना व स्त्रियांना जाचक वाटणारे कायदे रद्द करुन शेतमजूरांना न्याय हक्कांचा राष्ट्रीय कायदा करण्यात येईल. या आश्वासनामुळे त्यांच्यात असलेला असमतोल दूर होऊन त्यांना मानाने जगता यावे व स्त्रियांना आपल्या अधिकाराचा व स्वातंत्र्याचा वापर योग्य प्रकारे करता यावा म्हणून हे आश्वासन देण्यात आले होते.

७) सर्वांना मोफत शिक्षण देण्यात येईल. तसेच शिक्षणक्षेत्रातील विषमता दूर करुन समान शिक्षण पध्दत अवलंबण्यात येईल व १६ वर्षाखालील मुलांना व मुलींना शिक्षण सक्तिचे करण्यात येईल. अशा प्रकारच्या कायदा निर्माण झालेला आहे. परंतु शिक्षणातील विषमता दूर करण्याच्या दृष्टीने व सर्वांना सर्व प्रकारचे शिक्षण मोफत मिळावे यासाठी या पक्षाने हे वचन दिले होते.

८) इन्कम टॅक्स (उत्पन्न कर) भरण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेली १८ हजार रुपये मर्यादा ३० हजार रुपये करण्यात येईल. या तत्वानुसार सरकारने

उत्पन्न कराची मर्यादा सध्या वाढविली आहे.

९) रोजगाराचा हक्क हा मुलभूत अधिकार म्हणून त्याच्या घटनेत समावेश करण्यात येईल. देशाची राज्यघटनेमध्ये ही तरतुद करण्यात आली नव्हती. त्यामुळे देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी अशा प्रकारचा कायदा करण्याचे वचन या पक्षाने दिले होते.

१०) बौध्दांना व धर्मांतरित अनुसुचित जाती जमातींना पूर्वी मिळणारे घटनात्मक संरक्षण देऊन देशभर त्यांना शैक्षणिक व नोकरी विषयक हक्क दिले जातील. असे आश्वासन रिपब्लिकन पक्षाने दिले होते. कारण देशामध्ये नवबौध्द व धर्मांतरीत केलेल्या व्यक्तीला हक्कापासून वंचित रहावे लागत असल्यामुळे त्यांना असे आश्वासन दिले होते.

११) अनुसुचित जाती जमाती व बौध्द यांच्यावर होणा-या अत्याचाराना पायबंद बसेल असा सर्वंकष कायदा करण्यात येईल. कारण १९५५ साली व १९७६ साली अस्पृश्यांना संरक्षण मिळण्यासाठी २ कायदे करण्यात आले होते. परंतु त्यातील त्रुटी दूर होण्यासाठी सर्वंकष कायदा करण्याचे आश्वासन या पक्षाने जाहीरनाम्याद्वारे दिले होते.

१२) अनुसुचित जाती-जमाती यांना प्राप्त झालेले घटनात्मक संरक्षण काटेकोरपणे आमलात येण्याकरिता खास कायदा करण्यात येईल. कारण या कायद्यांची चांगली अंमलबजावणी होऊन याचा फायदा दलित व मागासलेल्या वर्गांना होऊ शकेल म्हणून असा कायदा करण्याचे आश्वासन या पक्षाने दिले.

१३) भटक्या विमुक्तांना जगण्याचे साधन व पक्की घरे देऊन त्यांना प्रस्थापित करण्यात येईल कारण स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत काही भटक्या लोकांना स्थलांतरीत पध्दतीने जगावे लागत होते. त्यामुळे त्यांचे हाल थांबविण्यासाठी हे आश्वासन दिले होते.

१४) झोपडपट्टी वासियांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन त्यांना स्वस्त आणि पक्की घरे देण्यात येतील. त्यासाठी त्यांना सुलभ व्याजाने १०० टक्के कर्ज देण्यात येईल असे आश्वासन या पक्षाने दिले होते. कारण बहुसंख्य दलित व मागासलेली जनता ही झोपडपट्टीत रहात असल्याने त्यांचे चांगले पूनर्वसन होण्यासाठी वरिल प्रयत्न करण्यात येईल.

१५) स्त्रियांना समान संधी व रोजगाराची विशेष उपलब्धता करण्यात येईल. सज्ञान मुलींना आई-वडिलांच्या संबंधित समान वाटा असणारा कायदा करुन तिला मिळालेल्या वाटपाचा विनियोग करण्याचा अधिकार तिला देण्यात येईल. व यासंबंधी अनेक कायदे महाराष्ट्र सरकारने सध्या केले आहेत.

१६) कुमारी मातांना व अपत्यांना पूर्ण संरक्षण व न्याय मिळेल असा कायदा करण्यात येईल. हा संपूर्ण आधुनिक पध्दतीचा कायदा करण्याचे अभिवचन या पक्षाने दिले होते.

१७) मंडल आयोगाची अंमलबजावणी करण्यात येईल व यानुसार महाराष्ट्र सरकारने मंडल आयोगाची अंमलबजावणी केली आहे.

१८) अनुसुचित जाती व जमाती व बौध्द यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांना पायबंद बसेल असा सर्वंकष कायदा करण्यात येईल. कारण देशातील विषमतेमुळे व जातीय अत्याचारामुळे दलितांना संरक्षण मिळावे म्हणून अशा प्रकारचा कायदा करण्याचे आश्वासन या पक्षाने दिले होते.

१९) आजारी गिरण्या व कारखाने ताब्यात घेऊन ते पूर्ववत सुरु करण्यात येतील. कामगारांना नुकसान भरपाई व निर्वाह भत्ता दिला जाईल हे आश्वासन रिपब्लिकन पक्षाने दिले होते.

२०) बंद पडलेल्या कारखान्यांची किंवा गिरणीखालील जमिन मालकांना विकण्याची परवानगी देणार नाही. अशा स्वरुपाचा कायदा देखील सध्या सरकारने केला आहे.

२१) असुरक्षित कामगारांना संरक्षण मिळेल अशा कायदेशीर तरतुदी करण्यात येतील. त्यांच्यामधील असुरक्षितता व संशयाचे वातावरण दूर करण्यासाठी हया तरतुदीचे आश्वासन कामगारासाठी या पक्षाने दिले होते.

२२) सफाई कामगारांना डोक्यावरून मैला वाहून नेण्याची पध्दत बंद करण्यात येऊन त्यांच्यासाठी विकासाच्या खास योजना राबविण्यात येतील असे वचन जाहीरनाम्याद्वारे या पक्षाने दिले होते.

२३) जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती रोखण्यात येतील. कारण भाववाढ व महागाई कमी करण्यासाठी व लोकांना योग्य दरात वस्तुंचा पुरवठा होण्यासाठी हे आश्वासन पक्षाने दिले होते.

२४) राष्ट्रीय एकात्मता व धर्म निरपेक्षता यांना धक्का लावणाऱ्या जात्यांध व धर्मांध शक्तींचा बिमोड करण्यात येईल. कारण यामुळे देशाची सार्वभौमता व एकता धोक्यात येत असल्यामुळे हे आश्वासन रिपब्लिकन पक्षाने दिले होते.

२५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेली समाजाधिष्ठित अर्थव्यवस्था आमलात आणून वर्गविहित, वर्णविरहीत समाज निर्माण करण्याचे आमचे ध्येय राहिल हे फार व्यापक प्रमाणावरचे ध्येय साकार करण्याचे वचन रिपब्लिकन पक्षाने दिले होते.

वरील प्रकारचा जाहिरनामा मंजूर करून निवडणूका लढवण्याच्या ठरवल्या होत्या. या जाहीरनाम्यात संपूर्ण बाबींचा समावेश केला असल्यामुळे व हा जाहीरनामा सद्य:स्थितीला अनुकूल असा तयार केला होता आणि अशा प्रकारचा जाहीरनामा हा खुल्या अधिवेशनात जनतेसमोर मांडून त्यावर मंजूरी मिळविण्याची ही घटना इतर कोणत्याही राजकीय पक्षात घडून आलेली नव्हती. रिपब्लिकन पक्षाचे नुकतेच ऐक्य घडून आल्याने सर्व रिपब्लिकन पक्षानी एकत्रित

असा तयार केलेला जाहीरनामा हे केवळेच वैशिष्टय या जाहीरनाम्याचे मानावे लागेल. या जाहीरनाम्यानुसार व सर्व रिपब्लिकन पक्षानी एकत्र येऊन निवडणूका लढवल्या असत्या तर रिपब्लिकन पक्षाला चांगले यश प्राप्त होऊ शकले असते. परंतु दुर्दैवाने रिपब्लिकन पक्ष हा एकसंघ न रहाता निवडणूकीत कोणत्या पक्षाला सहकार्य करावयाचे व कोणत्या पक्षाबरोबर युती करावयाची याबाबत ऐक्यवादी रिपब्लिकन पक्षात एकमत न झाल्यामुळे हा रिपब्लिकन फुटून त्याचे अनेक गट निर्माण झाले. त्यामुळे या जाहीरनाम्याला अनुसरुन रिपब्लिकन पक्षाने निवडणूका लढविल्या नाहीत. परंतु त्यांनी निर्माण केलेला हा १९९० चा जाहीरनामा हा आदर्शवत होता. या जाहीरनाम्यातील काही प्रश्न सरकारने सोडविले आहेत.

......

## प्रकरण दुसरे

## स द र्भ


(१) डॉ. भुषण जोगुळवार, प्रज्ञासूर्य, संपा. शरणकुमार लिंबाळे प्रचार प्रकाशन, नंदिनी गल्ली, कोल्हापूर, १९९१, पृ.क्र.३६८.

(२) डॉ. भुषन जोगुळवार, प्रज्ञासुर्य, संपा. शरणकुमार लिंबाळे, प्रकाशन नंदिनी गल्ली, कोल्हापूर, १९९१, पृ.क्र. ३७२.

(३) आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, पी.एस. चिक्कलठाणाकर, नाथ प्रकाशन, औरंगाबाद, १९७९, पृ.क्र.४६, ४७, ४८, ४९, ५०, ५१.

(४) १९६२ रिपब्लिकन पक्षाचा जाहिरनामा प्रकाशक रिपब्लिकन पक्ष कमिटी.

(५) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया जाहिरनामा, इ.स. १९९०. (शरणकुमार लिंबाळे, भारतीय रिपब्लिकन पक्ष).


.....